# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.05.2026** **वारः सोमवार**

---

1. पश्चिम बंगाल, केरळम, तामिळनाडू, आसाम आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीला सुरुवात.
2. मिशन दृष्टी या उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण हा भारताच्या अंतराळ प्रवासातील महत्त्वाचा टप्पा- उपराष्ट्रपती आणि पंतप्रधानांची प्रतिक्रिया
3. अमेरिका-इराण यांच्यातील शांतताविषयक वाटाघाटींमध्ये प्रगतीची शक्यता अजूनही धूसर आणि
4. अटलांटिक महासागरातून प्रवास करत असलेल्या प्रवासी जहाजात हंता विषाणूच्या उद्रेकामुळे तीन जणांचा मृत्यू

**<u>निवडणूक मतमोजणी</u>**

पश्चिम बंगाल, केरलम, तामिळनाडू, आसाम आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीला नुकतीच आठ वाजल्यापासून सुरुवात झाली आहे. आसाम विधानसभेच्या सर्व 126 जागा, केरलममधील 140 आणि पुद्दुचेरीमधील 30 जागांसाठी 9 एप्रिलला मतदान झालं होतं. तर तामिळनाडूतील सर्व 234 जागांसाठी आणि पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यासाठी 23 एप्रिलला मतदान झालं होतं. बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यातलं मतदान 29 एप्रिलला पार पडलं होतं. पश्चिम बंगालमध्ये आज 293 जागांच्या मतांची मोजणी करण्यात येत आहे. तिथल्या फालता मतदारसंघात 21 मे रोजी फेरमतदान घेण्यात येणार असून या जागेची मतमोजणी 24 तारखेला होणार आहे.

आठ वाजता मतमोजणीला सुरूवात झाल्यानंतर अगोदर टपालाद्वारे पाठवण्यात आलेल्या मतपत्रिकांची मोजणी करण्यात येत आहे. त्यानंतर मतदान यंत्रांवर नोंदवलेल्या मतांच्या मोजणीला सुरुवात होईल. दुपारपर्यंत कल हाती येण्याची अपेक्षा असून संध्याकाळ पर्यन्त सर्व विधानसभांचं एकंदर चित्र स्पष्ट होईल. या मतमोजणीसाठी चारही राज्यं आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात चोख व्यवस्था करण्यात आली आहे. विशेषतः पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाने अतिरिक्त निरीक्षक आणि पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मतमोजणी निरीक्षकांच्या मदतीसाठी अतिरिक्त 165 निरीक्षक, तर मतमोजणी केंद्राच्या आसपास सुरक्षिततेसाठी 77 अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी इथंही चोख बंदोबस्त तैनात केला आहे. आसाममध्ये राज्य सशस्त्र पोलिसांच्या 93 तुकड्या विविध जिल्ह्यांमध्ये आधीच तैनात केल्या आहेत. महाराष्ट्रातल्या बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणीही आज होत आहे.

**<u>मिशन दृष्टी</u>**

बंगळुरूच्या गॅलेक्स आय या स्टार्टअपनं तयार केलेल्या मिशन दृष्टी या उपग्रहाचं काल कॅलिफोर्निया इथं स्पेसेक्सच्या फाल्कन 9 या रॉकेटच्या सहाय्यानं अंतराळात प्रक्षेपण करण्यात आलं. 190 किलो वजनाचा मिशन दृष्टी हा भारतातील खासगी कंपनीनं बनवलेला आतापर्यंतचा सर्वात मोठा पृथ्वी निरीक्षण उपग्रह आहे. मिशन दृष्टी या उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण हा भारताच्या अंतराळ आणि नवोन्मेषाच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित करत त्याचं स्वागत केलं आहे.

**<u>इराण-अमेरिका संघर्ष</u>**

पश्चिम आशियातील संघर्ष संपविण्याच्या अनुषंगानं अमेरिकेबरोबरच्या चर्चेतली कोंडी फोडण्यासाठी इराणने काल अमेरिकेपुढे मांडलेल्या बहुस्तरीय प्रस्तावातील काही महत्त्वाचे मुद्दे अमेरिकेनं नाकारले आहेत. त्यामुळे अमेरिका आणि इराण

यांच्यातील शांततेच्या वाटाघाटीत अजूनही काही लक्षणीय प्रगतीची चिन्हं नाहीत. त्यामुळे उभय देशांदरम्यान सध्या सुरू असलेली युद्धबंदीची स्थिती नाजूक आणि ताणलेलीच आहे. युद्ध संपवण्याच्या उद्देशानं इराणनं पाठवलेल्या 14 कलमी प्रस्तावाला अमेरिकेनं प्रतिसाद दिला असल्याचं इराण सरकारच्या प्रवक्त्यानं म्हटलं आहे, मात्र हा प्रतिसाद विचाराधीन असल्याचं त्यांनी पुढे नमूद केलं. दरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायली पत्रकारांशी बोलताना आपण या प्रस्तावाचं परीक्षण केलं असल्याचं सांगत तो स्वीकारार्ह नसल्याचं म्हटलं. इराणनं अद्याप या युद्धाची पुरेशी किंमत मोजलेली नाही असं म्हणत ट्रम्प यांनी अमेरिकेकडून अधिक ताठर पवित्रा घेतला जाण्याचे संकेत दिले.

**<u>प्रोजेक्ट फ्रीडम</u>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत ज्यांची जहाजं अडकून पडली आहेत, अशा देशांना मार्गदर्शन करण्यासाठी अमेरिकेच्या वतीनं प्रोजेक्ट फ्रीडम ही मोहीम सुरू करण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे शेकडो जहाजं आणि जवळपास 20 हजार खलाशांना मदत होईल, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. इराण युद्धामुळे ज्या तटस्थ आणि निरापराध देशांना त्रास सोसावा लागत आहे, अशा देशांना जलमार्गाच्या प्रतिबंधित भागातून मार्ग काढण्यास मदत करण्याचं आश्वासन अमेरिकेनं दिलं आहे. त्यानुसार राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमात मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशक, शंभरहून अधिक विमानं आणि 15 हजार सैनिकांचा समावेश असेल, असं अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं म्हटलं आहे.

**<u>ओपेक निर्णय</u>**

दरम्यान पश्चिम आशियामधला संघर्ष अद्याप सुरुच असल्यानं ओपेक अर्थात पेट्रोल निर्यात करणाऱ्या देशांच्या संघटनेनं येत्या जून महिन्यात पेट्रोलचं अधिक उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला आहे. ओपेक प्लस गटातल्या सात देशांनी पुढच्या महिन्यात तेल उत्पादनाचं लक्ष्य दररोज अंदाजे 1 लाख 88 हजार बॅरल इतकं वाढवायला तत्वतः सहमती दर्शवली आहे. संयुक्त अरब अमिरात अलीकडेच या गटातून बाहेर पडल्यानंतर आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीवर मोठ्या प्रमाणावर निर्बंध येत असल्यानं हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

**<u>राजनाथ सिंग</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं रक्षा त्रिवेणी संगम याविषयावरील चर्चासत्राचं उद्घाटन उद्घाटन करणार आहेत. भारतीय लष्कराचा 'उत्तर विभाग' आणि 'केंद्रीय कमांड' तसंच भारतीय संरक्षण साहित्य उत्पादक कंपन्यांच्या संघटनेनं तंत्रज्ञान, उद्योग आणि सैनिकी सेवा या त्रिसुत्रीवर आधारित या तीन दिवसीय चर्चासत्राचं संयुक्तरीत्या आयोजित केलं आहे. लष्करी मोहिमांमधील आव्हानांवर मात करण्यासाठी अत्याधुनिक आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो तसंच त्यांचा लष्करी व्यवस्थेत समावेश करण्यासाठी काय करता येईल याबाबत हे चर्चासत्र एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली आहे. 280 पेक्षा अधिक कंपन्या नव्याने विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादनांसह या चर्चासत्रातील प्रदर्शनात सहभागी होतील.

**<u>भारत-जमैका</u>**

सातत्य आणि वेळोवेळी होणारे बदल यांचा हे भारत आणि जमैका यांच्यातील संबंधांचे वैशिष्ट्य असून सामायिक इतिहास हा या संबंधाचा पाया आहे. उभय देशांमधील सध्याच्या सहकार्यामुळे या संबंधांना नवी ऊर्जा मिळाली असून ते आणखी वृद्धिंगत होण्याच्या भविष्यात अमर्याद शक्यता आहेत, असे उद्गार परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल काढले. जमैकातील एका खासगी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत जयशंकर बोलत होते. भारताचे कॅरिबियन देशांशी असलेले धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशानं जयशंकर सध्या जमैका, सुरीनाम आणि त्रिनिदाद आणि टोबॅगो या देशांच्या नऊ दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात ते शनिवारी किंग्स्टन इथं पोहोचले.

**<u>लिपुलेक</u>**

कैलास मानसरोवर यात्रेसाठी लिपुलेक खिंडीतून जाणारा मार्ग 1954 पासून वापरला जात असून ही काही नवीन गोष्ट नाही. असं भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं नेपाळच्या दाव्यांबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. कैलास मानसरोवर यात्रेच्या

संदर्भात नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयानं हा मार्ग आपल्या हद्दीत येत असल्याबद्दल केलेल्या दाव्यासंदर्भात प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांवर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी हा खुलासा केला. नेपाळकडून करण्यात येत असलेले दावे असमर्थनीय आहेत, असे दावे ऐतिहासिक तथ्यं आणि पुराव्यांवर आधारित नसल्याचं जयस्वाल यांनी नमूद केलं. महाकाली नदीच्या पूर्वेकडील लिम्पियाधुरा, लिपुलेक आणि कालापानी हा भाग 1816 पासूनच नेपाळचे अविभाज्य भाग आहेत असा दावा नेपाळनं केला आहे.

**<u>हंता विषाणू</u>**

अटलांटिक महासागरातून प्रवास करत असलेल्या प्रवासी जहाजात हंता विषाणूच्या उद्रेकामुळे तीन जणांचा मृत्यू झाल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे. एका रुग्णाला या विषाणूची बाधा झाल्याची खात्री झाली असून आणखी पाच जणांना हंता विषाणूचा संसर्ग झाल्याचा संशय असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्यावतीनं पत्रकारांना सांगण्यात आलं. दक्षिण आफ्रिकेतील जोहानसबर्ग इथं एका 69 वर्षीय ब्रिटिश नागरिकावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अर्जेंटिनातील केप वेर्दे इथून पश्चिम आफ्रिकेतील किनारपट्टीच्या दिशेनं प्रवास करत असलेल्या एमव्ही ओन्डियस या क्रूझवर या विषाणूचा संसर्ग झाल्याचं वृत्त आहे. बहुतेकदा या विषाणूची लागण झालेल्या उंदराच्या मलमूत्रातून त्याचा संसर्ग होतो.

**<u>युएई विमानं</u>**

पश्चिम आशियातील संघर्षामुळे संयुक्त अरब अमिरातींमधून भारतातील विविध विमानतळांवरील काही काळ स्थगित करण्यात आलेली विमान सेवा आता पूर्ववत सुरू करण्यात आली आहे. युएईच्या सर्वसाधारण नागरी विमान वाहतूक प्राधिकरणानं आपल्या देशाच्या हवाई हद्दीतून होणाऱ्या विमान वाहतुकीवर तात्पुरत्या कालावधीसाठी घातलेले निर्बंध उठवण्यात येत असून विमानसेवा पूर्ववत सुरू करण्यात करण्यात येत असल्याची घोषणा केली, त्यानंतर युएईतून भारतात विमानसेवा पूर्ववत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठा आणि सागरी वाहतूक सुरळीत राहण्यासाठी तसंच भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याचं पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार